| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर**<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>**मो.क्र.9819208279** | |

**प्रेसनोट** **दिनांक १६.१२.२०२४**

## “ रूपये ७,४३,२२०/- किमतीची एम.डी. पावडर तसेच ३,६३,०००/- रू. किमतीचे नशेकरीता उपयोगात येणारे कोडीनयुक्त कप सिरप औषध असा अंमली पदार्थ जप्त ”

———————————००००००००० ——————————

दिनांक ११/१२/२०२४ रोजी प्राप्त माहितीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांनी खर्डीगाव येथील तलाव, खर्डीकडुन दिवाकडे जाणारे रोडवर, मुंब्रा, ता.जि. ठाणे या ठिकाणी इसम नामे मोहम्मद अब्दुल रेहमान सय्यद उर्फ नॉडी, रा.खोणीगांव हा त्याच्या ताब्यात एकुण ६०.३ ग्रॅम वजनाचा ‘एम.डी. Mephedron’ हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आल्याने सदरबाबत मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक । २३८६/२०२४ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(क), २२ (क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयात सदर इसमास अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक १६/१२/२०२४ रोजीपावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. अटक आरोपी याने ‘एम.डी. Mephedron’ हा अंमली पदार्थ कोठुन मिळविल्या ? याव्यतिरीक्त आणखी साठा आहे का ? याबाबत तपास सुरु आहे.

तसेच दिनांक १२/१२/२०२४ रोजी प्राप्त माहितीच्या आधारे १८.२५ वा. चे सुमारास कुल्हड चहा, वडापाव सेंटर कडुन-गणेश खिंडीमार्गे कल्याण फाटयाकडे जाणारे रोडवर, डायघर, ठाणे येथे इसम नामे नवाज शमशद्दीन पावले, रा.मुंब्रा,ठाणे हा त्याच्या ताब्यात कोडीनयुक्त कफ सिरप या औषधाच्या एकूण ७२० बॉटल्स विक्रीकरण्यासाठी बेकायदेशिरपणे कब्जात बाळगल्या असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले असुन सदरबाबत शिळ डायघर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक । १६९९ /२०२४ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २२ (क) सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे कलम १८ क, १८ अ, शिक्षा कलम २७ (ब) व २८(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन त्यात त्यास अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपी याची दिनांक १७/१२/२०२४ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. सदरचा जप्त बॉटल कोठुन मिळविल्या? याव्यतिरीक्त आणखी साठा आहे का? याबाबत तपास सुरु आहे.

सदर दोन्ही कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त(गुन्हे) व श्री.धनाजी क्षिरसागर, सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रतिबंध) गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के, सपोनि/निलेश मोरे, सपोनि/जगदीश गावित, पोउपनि/दिपेश किणी, पोउपनि/नितीन भोसले, पोउपनि राजेंद्र निकम, पोहवा/५७२९ हरिश तावडे, पोहवा/४२४८ अमोल देसाई, पोहवा/३७४५ अभिजित मोरे, पोहवा/३७३१ विक्रांत पालांडे, पोहवा/१८५९ हेमंत महाले, पोहवा/२७८८ महेश साबळे, पोहवा/६४३६ संदीप भांगरे, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, मपोहवा/६८५२ शिल्पा कसबे, पोना/४७४८ अनुप राक्षे यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर